परिवहन समितीच्या शनिवार दि. १८/११/२०१७ रोजी सकाळी ११:०० सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सभापती |
| 2. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 3. | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 4. | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 5. | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 6. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 7. | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 8. | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 9. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 10. | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |

**अनुपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 2 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 3 | **श्री. संदीप चंद्रभान जाधव<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **श्री. शिवाजी जगताप** | **परिवहन व्यवस्थापक** |
| 2 | **श्री. हरिष दुबे** | **निगम सचिव** |

मा.सभापती, यांनी परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक २९** :— नस्तीतील पृष्ठ क्र १ वर नमुद निगम सचिव यांचे प्रस्तावाला अनुसरून, मनपा ठराव क्र १०८, दि. १६/१०/२०१७ चे अनुषंगाने मा. सदस्य तथा विरोधी पक्षनेता श्री. तानाजी सुकलाजी वनवे यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट ''घ'' मध्ये प्रकरण (दोन) मधील महानगरपालिका कामकाजाचे नियम १ (जे) अन्वये मा. सदस्य तथा विरोधी पक्षनेता श्री. तानाजी सुकलाजी वनवे यांना परिवहन समितीच्या दि. १८/११/२०१७ रोजी चे आयोजित बैठकीत आमंत्रित करून त्यांनी विचारलेल्या प्रश्नावर त्यांचे मत ऐकुन घेण्याकरिता व आवश्यक वाटल्यास विषय सभागृहाचे पटलावर ठेवण्याकरिता मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून या विषयास मा.विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे यांनी विरोध दर्शविला व पुढील

कार्यवाहीकरिता हा विषय निगम सचिवांकडे पाठविण्यात यावा असे समितीने एकमताने ठरविले.

श्री.तानाजी वनवे:— मा.नगरसेवकांना प्रश्न विचारण्याचा कायदेषिर अधिकार आहे. मा.सदस्यांनी नोटीस देवून विचारलेले प्रश्न विशेष समितीकडे पाठविण्याबाबत कायद्यात काही तरतूद आहे काय? याचा जी. आर.दाखविण्यात यावा. मा.सदस्यांच्या अधिकाराचे हनन होवू नये. कायद्यात बदल करण्याचा महासभेला अधिकार आहे काय? छोटयाश्या कागदावरती हा प्रश्न मंजूर करण्यात आला. हा प्रश्न सभागृहासमोर आणावा असे आमचे म्हणणे आहे आणि बहुमताने त्यांनी पास करून घ्यावे. हाऊसमध्ये आमचे प्रश्न नामंजूर व्हावे असा कायद्यानुसार ऑफीसच्या अजेंडयावर असा ठराव आणला आहे काय?

निगम सचिव:— मा. सभापती, मी या विषयावर कोणतेही भाष्य करणार नाही. मा.सत्तापक्ष नेते, मा. विरोधी पक्ष नेते आणि मा. गटनेता यांच्या सहीने हा प्रस्ताव सभागृहात आला आहे.

श्री. तानाजी वनवे:— मा. सभापती, आम्ही चुकीच्या पत्रावर सही केली. त्या पत्राचे आम्ही खंडन केले आहे.

श्री.जमाल:— मा.सभापती, ज्या दिवशी बोलणे झाले त्याच दिवशी प्रस्ताव आणला गेला.

निगम सचिव:— मा.सभापती, नोटीसद्वारे येणारे मा.सदस्यांचे प्रश्न विशेष समितीकडे अग्रेशित करण्यात येतात आणि विशेष समितीला हा अधिकार प्रदान करण्यात करण्याचा ठराव मंजूर झाला आहे. ॲक्टमध्ये तशी प्रोव्हीजन आहे. महासभा आपला अधिकार विशेष समितीला देवू शकते.

श्री.तानाजी वनवे:— हा जो ठराव आला हा ठरावच इललिगल आहे या संबंधाने तसे पत्र मा. महापौरांना आणि आयुक्तांना दिले आहे. याबाबत मा. महापौरजी आणि आयुक्तांशी चर्चा केली आहे त्यांना लेखी पत्र दिले आहे.

निगम सचिव:— मा.सभापती, ठराव क्रियान्वीत झाला आहे आणि त्यानुसार सर्वांना सुचना गेल्या आहेत.

श्री.तानाजी वनवे:— तो ठराव आम्ही ताबडतोब खंडीत केला आहे. सत्तापक्षांना हा ठराव घ्यायचा असेल तर त्यांनी बहुमताने घ्यावा. आम्ही या ठरावाचा निषेध करतो आणि सभात्याग करतो.

सभापती:— मा. विरोधी पक्ष नेता श्री.तानाजी वनवे त्यांचा विषय होता ते ठरावाचे निषेध करून निघून गेले. त्यांनी ज्या ठरावाचा निषेध केला त्या ठरावावर सही झालेली आहे. बसपा गटनेते श्री. जमाल यांनी सुध्दा स्वाक्षरी केली आहे. ते समितीचे म्हणणे ऐकुन घेण्यात तयार नव्हते. त्यांनी ठरावाचा विरोध केला आहे. आपले म्हणणे समिती समक्ष ठेवले असते तर समितीच्या माध्यमातून त्याचे निराकरण झाले असते.

श्री.नितीन साठवणे:—मा. सभापती, त्यांचे जर समाधान झालेले नाही तर हा विषय हाऊस समोर पाठविण्यास हरकत नाही. त्यात आपली पारदर्शकता राहील हा ठराव यासाठी आला आहे की हाऊसचा वेळ जावू नये. परंतु त्यांचे समाधान झाले नाही तो विषय हाऊससमोर ठेवू शकतात.

सभापती:—हा विषय समितीतर्फे महासभेसमोर पाठविता येणार नाही. मा.विरोधी पक्ष नेत्यांनी निषेध नोंदविला आहे हा विषय आपण निगम सचिवांकडे पाठवू की समाधान झालेले नाही आपण त्यावर उपरोक्त कार्यवाही करावी.

<u>ठराव क्रमांक ३०</u> :— राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेकरिता परिवहन विभागाच्या बसेस विनामुल्य उपलब्ध करून देण्याकरिता राष्ट्रीय 82nd Senior National Badminton Championship 2017, Nagpur यांनी महानगरपालिकेच्या बसेस खेळाडु सपोर्ट स्टाफ व खेळाडु यांचे खेळाचे सामान याकरिता १० डिझेल व १० ग्रीन बसेस ची मागणी केली होती त्या मोबदल्यात त्यांनी मोबिलीटी पार्टनर म्हणुन महानगरपालिकेला खालील प्रमाणे फायदे दिले.

१) महानगरपालिकेचे बोध चिन्ह, ब्रॉशर, आमंत्रण पत्रिका, वेबसाईट व जाहिरातीमध्ये लावणे.
२) बसेस व बसेस वर देण्यात येणाऱ्या जाहिरातीवर मनपाचे बोध चिन्ह
३) बस स्थानकाकरिता स्टेडीयम मधे स्वतंत्र जागेची उपलब्धता

याकरिता महानगरपालिकेला विभागाद्वारे ग्रीन बस बस व डिझेल बस ऑपरेटर यांना किमान कि.मी. करिता (Assured KM) जी.सी.सी. तत्वावर कंत्राट असल्याने डिझेल बस व ग्रीन बस ऑपरेटरचे भुगतान कि.मी. निहाय नागपूर महानगरपालिकेस करावे लागेल.

| | | |
|---|---|---|
| १) ग्रीन बस | — ५ बसेस — | रुपये ७६५०००/— |
| २) मिडी डिझेल बस | — ५ बसेस — | रुपये ४१८६८०/— |
| | एकुण — | रुपये ११८३६८०/— |

उपरोक्त स्पर्धेचे प्रायोजकत्व स्विकारल्यामुळे नागपूर महानगरपालिकेला रुपये ११८३६८०/— चा खर्च देय राहील.

दि. ०१ नोव्हेंबर २०१७ ते दि. ०९ नोव्हेंबर २०१७ पर्यंत या स्पर्धा होणार असल्याने व परिवहन समितीची बैठक होऊ न शकल्याने बसेस देण्याकरिता तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली व हा विषय परिवहन समिती समक्ष ठेवण्याकरिता मा. सभापती यांनी निर्देशित केले आहे. त्याअनुषंगाने या विषयास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून या विषयाला मा.सदस्य श्री.नितीन साठवणे व मा.सदस्य श्री.नरेंद्र वालदे यांनी विरोध दर्शविला व त्यास बहुमताने मंजुरी प्रदान केली.

श्री.नितीन साठवणे:—मा.सभापती, महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या बसेस फुकटात दिल्या. बसेस फुकटात दिल्यानंतर स्पर्धेच्या पासेस किंवा तिकीट मा.सभापती यांना देण्यात आल्या काय? त्यांनी पैसे घेवून तिकीटा विकल्या. मग आपण त्यांना फुकटात कशाला दयायच्या. आपले बोधचिन्ह त्यांनी वापरले काय? जाहिरातीमध्ये त्यांनी लावले किंवा नाही हे कुणी जावून बघितले आहे काय? आपल्या महानगरपालिकेकडून कोणत्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती काय?

परिवहन व्यवस्थापक:—मा.सभापती, याची समिक्षा निश्चित करण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त प्रायोजक म्हणून महानगरपालिकेचा सातत्याने उल्लेख होता. महानगरपालिकेचे बोधचिन्ह, ब्रॉशर आणि जे काही उपलब्ध साहित्य आहे ते त्वरित मागविण्यात येईल. मोबिलीटी पार्टनर म्हणून ज्या गोष्टीचा संबंध होता त्या गोष्टी मागविण्यात येतील.

श्री. नितीन साठवणे:—मा. सभापती, त्यांनी खरोखरच आपले बोधचिन्ह वापरले होते काय? याकरिता महानगरपालिकेची कुठल्या अधिकाऱ्याची एखादी टीम नेमण्यात आली होती काय?

परिवहन व्यवस्थापक:—मा.सभापती, महानगरपालिकेचा लोगो वापरल्या संदर्भात सदृश्य तपासणी करून मागविण्यात आले आहे. तसेच महानगरपालिकेचा लोगो प्रायोजकत्व म्हणून उपलब्ध करून देण्यात आला होता.

श्री.नितीन साठवणे:—मा.सभापती, यामध्ये परिवहन विभागाचा काय फायदा झाला. रू.११,८३६८० इतक्या मोठया रक्कमेत खर्च येत असतांना त्यांनी साधे पासेस किंवा तिकीट सुध्दा दिलेले नाही. आपणही हा खर्च देवू नये. उद्या जर क्रिकेट टीम जर आली आणि प्रायोजक म्हणून महानगरपालिका असेल तर आपल्याला फुकट तिकीटे देण्यात येतील काय? त्यामुळे यात महानगरपालिकेचा कोणताही फायदा झालेला नाही. बसेस देण्याचा असा तडकाफडकी निर्णय कसा काय घेण्यात आला.

श्री. नरेंद्र वालदे:—मा.सभापती, आधीच परिवहन विभागात नुकसानीत चालत आहे तरीही आपण हा खर्च करीत आहे.

परिवहन व्यवस्थापक:—मा.सभापती,राश्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेकरिता सर्व आंतरराष्ट्रीय खेळाडू स्पर्धेसाठी आले होते. त्यात सायना नेहवाल, पी.व्ही.सिंधू ऑलींम्पीक विजेत्या आणि विजेते पुरूष बॅटमिंटनपटू, सपोर्ट स्टाफ व खेळाडू यांचे खेळाचे सामान आणण्याचा आणि या स्पर्धेसाठी मोबिलीटी पार्टनर म्हणून नागपूर शहराला मान मिळाला. यामध्ये महानगरपालिका एक प्रायोजक मोबिलीटी पार्टनर होती. मोबालिटी पार्टनर म्हणून २५ लक्ष रूपयाची फीस आकारलेली होती. त्यासाठी १० गाडया मोबिलीटी पार्टनर म्हणून द्यावयाच्या होत्या. याचा खर्च रू.११,८३६८० निश्चित झालेला आहे. आपल्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेचा प्रसार व्हावा. नागरिकांना याच्या माध्यमातून जागतिक स्तरावरील बॅडमिंटन खेळाडू शहर बस वाहतुकीचा वापर करतात तसेच सर्व साधारण व्यक्तिंनी सुध्दा याचा वापर करावा असा त्या मागचा उद्देश होता. व्यक्तिगत वाहनाचा वापर सोडून पब्लिक ट्रान्सपोर्टचा वापर व्हावा. आयकॉनिक असलेले खेळाडू याचा वापर करतांना त्यांचे फोटो पब्लिश झाले आहे. याचा शहरबस वाहतुकीवर चांगला परिणाम होईल हा या मागचा उद्देश होता.

श्री.नितीन साठवणे:—जागतिक स्तरावरील खेळाडू बसमध्ये बसले हे कुणी पाहिले आहे काय? की ते विशेष वाहनात आले आणि गेले. आपल्या बसेसचा उपयोग त्यांनी साहित्य, टेक्निशियन वर्ग त्यांचा कर्मचारी वर्ग यांच्या येण्याजाण्यासाठी वापर केला हे कुणाला माहीत आहे काय?

परिवहन व्यवस्थापक:—मा.सभापती, आपल्या बसेसमध्ये बसलेल्या जागतिक स्तरावरील खेळाडूंचे छायाचित्र घेतलेले आहे.

श्री.नरेंद्र वालदे:— आपला कोणता अधिकारी नेमला गेला काय?

परिवहन व्यवस्थापक:—मा.सभापती, आपण फक्त बसेस दिलेल्या आहेत. बाकी व्यवस्थेसाठी दुसरी एक संस्था कार्यरत होती त्यामुळे वाहतुक विभागाचा कोणत्याही अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता वाटली नाही. बसेससाठी ऑपरेटरचे प्रतिनिधी नियुक्त केले होते. वृत्तपत्रात आलेल्या बातमीनुसार या स्पर्धेमध्ये नि:शुल्क प्रवेश होता. तिकीटांच्या बाबतीत माहिती नाही येणाऱ्या सभेत माहिती देण्यात येईल.

श्री.नितीन साठवणे:—मा.सभापती, या भुर्दंडामुळे महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचा कोणताही फायदा झालेला नाही. याचे भुगतान कोण करणार आहे. जर हे मंजुरच करावयाचे होते तर परिवहन समितीची बैठक कां लावण्यात आली नाही. सदस्य अनुपस्थित राहिले असते तर तो निर्णय घेण्याचा अधिकार आपल्याला राहीला असता.

परिवहन व्यवस्थापक:—मा.सभापती, या बसेस उपलब्ध करून देण्याबाबत याची प्रशासकीय मान्यता मा.आयुक्तामार्फत लेखी स्वरूपात घेण्यात आली होती. प्रायोजक म्हणून आणि महानगरपालिका ट्रान्सपोर्ट मोबालीटी पार्टनर म्हणून संम्मेलित होती. हा कोणत्याही प्रकारचा भुर्दंड नाही.

सभापती :— परिवहन विभाग हे महानगरपालिकेचे महत्वाचे अंग आहे. महानगरपालिका मोबालीटी पार्टनर म्हणून होती. शासनाचा आदेश होता २५ लक्ष रू. बॅटमिंटन फंड म्हणून दयावा. त्यावेळी महानगरपालिकेने सांगितले पैसे देवू शकत नाही जी काही सेवा असेल ती देण्यास तयार आहोत. त्या सेवेचा घटक म्हणून परिवहन विभागाकडून सेवा म्हणून १० रेड बसेस आणि १० ग्रीन बसेस मागितल्या होत्या परंतु आपण ५ रेड बसेस आणि ५ ग्रीन बसेस दिल्या. त्या बसेसवरती देण्यात येणाऱ्या जाहिरातीवर मनपाचे बोधचिन्ह तसेच ब्रॉशर, आमंत्रण पत्रिका वेबसाहिटवर जाहिरात लावण्यास सांगण्यात आले होते. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूने या बसेसचा वापर केला त्याप्रमाणे जनतेने त्याचा वापर करावा याचा प्रसार व्हावा या पाठीमागचा उद्‌देश होता. याचे फोटोग्राफ पुढच्या सभेमध्ये दाखविण्यात येतील.

<u>ठराव क्रमांक ३१ :—</u> आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर

सभापती<br>परिवहन समिती<br>महानगरपालिका,नागपूर